Ajanta Education Society, Aurangabad's

# LATE BABURAOJI KALE COLLEGE, AJANTA

## Tq. SILLOD, DIST. AURANGABAD - 431117

Senior and Junior college

(Arts, Commerce and Science)



Affiliated Dr. Babasaheb Ambedkar Marathwada university, Aurangabad

e- Prospectus- 2022-23

Website: www.bkcollegeajanta.org

Email: ajantabkcollege@gmail.com

Instructions for admission:

1. Students who have passed the 10th and 12th can secure the admission to the faculty of their choice.
2. Procedure for admission is very simple and admission forms are made available in Marathi for better understanding. Each student has to fill up the form at entry level of the courses (Junior and Senior) offered by the college.
3. He/she must fill up and submit the handwritten form with essential documents; marks memo, TC/LC, SSC/ HSC certificate for date of birth verification, Income certificate of parents, category certificate, scholarship holders with his/her sanction number/ passbook-first-page copy.
   The students submitting the duplicate TC will have to pay full fee.
4. The admission form must have the information of mobile number of ward and parents/guardian.
5. The admission in any course shall be governed by GR, Rules and Regulations notified by Govt. of Maharashtra, Maharashtra Higher Education Board and Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.
6. The list of admitted student finalized prior to the dates declared by respective authorities and forwarded to HSC board and Academic section, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University.
7. The students has to submit the all required credentials to complete and confirm the admission.
8. Fee concession shall be decided by the Management.
9. Scholarship forms should be submitted in stipulated time with all required documents. If Govt. does not approve the scholarship, due to some lacunas, then student have to pay full prescribed fee before the start of examination.
10. A photocopy of Aadhar/Election voting card be annexed with form.

## प्रवेश घेण्यासाठी सुचना

विद्यार्थ्याला ज्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा असेल त्या वर्षापुर्वीची परीक्षा विद्यार्थ्यास अधिकृतपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१. विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज पुर्णपणे व अचूक भरावा. प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे उदा. शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रक, उत्पन्नाचे प्रमाणपत्र इ. सोबत जोडून प्रवेश अर्ज दाखल करावा.

२. प्रवेश अर्ज विद्यार्थ्याने स्वत: भरुन महाविद्यालयात योग्य ती फी भरुन दाखल करावा पूर्ण फी भरल्याशिवाय प्रवेश निश्चित होणार नाही.

३. प्रवेश अर्ज पालकांचे / वडीलांचे उत्पन्न, कायमचा पत्ता, फोन नंबर व इतर माहिती अचुक भरुन ॲडमिशन कमिटीकडून तपासून घेऊनच कार्यालयात द्यावा.

४. विद्यार्थ्याने त्यास घ्यावयाची विद्याशाखा व विषय यांची अचूक निवड करुनच प्रवेश फॉर्मवर लिहावे माहिती पत्रकात दिलेल्या ग्रुपमधूनच विषयाची निवड करावी.

५. महाविद्यालयात प्रवेश गुणवत्ता व वर्तणुकीचा विचार करुन दिला जाईल.

६. विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश दिलेल्या मुदतीतच घ्यावा.उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

७. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासंबंधीचे नियम व अटी, आरक्षण महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार असतील.

८. प्रवेश अर्ज स्विकारल्यानंतर प्रवेश देण्याचा अंतिम अधिकार प्राचार्यांना राहिल व प्राचार्यांच्या स्वाक्षरी नंतरच प्रवेश निश्चित होईल.

९. डुप्लीकेट टी.सी.धारक विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरावे लागेल.

१०. महाविद्यालयाने वेळोवेळी केलेल्या सूचनेप्रमाणे व मागणी केल्यास इतर कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थ्यास करावी लागेल.

११. फी सवलत स्कॉलरशीप इत्यादींसाठी विद्यार्थ्याने मुदतीत अर्ज न केल्यास व ती न मिळाल्यास त्या बाबतची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. सदरील फी सवलत /स्कॉलरशीप नामंजूर झाल्यास विद्यार्थ्यास पूर्ण फी भरावी लागेल.

१२. शिक्षणात खंड असल्यास व अशा विद्यार्थ्यांना फी सवलती /शिष्यवृत्ती घ्यावयाची असल्यास मा.तहसिलदार यांचे गॅप सर्टिफिकेट जोडावे.

१३. ई.बी.सी.फॉर्म सोबत २ प्रतिमध्ये सक्षम अधिकाऱ्याचे तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व वडीलांचे आपत्य संबंधीचे प्रमाणपत्र जोडावे

१४. विद्यार्थ्यांनी आपला रक्त गट प्रवेश फॉर्मवर द्यावा.

१५. आधार कार्ड /मतदान कार्ड / प्रवेश फॉर्म सोबत जोडावे.

१६. प्रवेशा सोबत ॲन्टी रॅगींग फॉर्म भरणे अनिवार्य आहे.

## विद्यार्थ्यांसाठी शिस्तपालनाचे नियम

१ महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र घेतले पाहिजे. ओळखपत्र अचुक संपूर्ण माहिती, भरुन त्यावर आपला नविन फोटो लावुन प्राचार्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने महाविद्यालयात भरलेल्या फी च्या पावत्या सांभाळून ठेवाव्यात.

२ विद्यार्थ्यांने आपले ओळखपत्र महाविद्यालयात येताजातांना ,प्रांगणात वावरतांना तसेच ग्रंथालय व परीक्षेत बसतांना स्वत:जवळ बाळगणे आवश्यक आहे.

३ ओळखपत्र हरवल्यास किंवा त्यांचा गैरवापर झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील.

४ विद्यार्थ्यांना डुप्लीकेट ओळखपत्र प्राचार्यांच्या परवानगीने व रु.२० भरुन मिळू शकेल.

५ विद्यार्थ्याने महाविद्यालयातील आपला प्रवेश रद्द केल्यास ओळखपत्र जमा करावे.

६ महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना विद्यार्थ्याने वाचल्या पाहिजे. त्यासाठी रोज सूचना फलक पाहण्याची सवय ठेवावी.

७ विद्यार्थ्याने आपल्या विषयाच्या तासिकांना नियमीत हजर रहावे.

८ विद्यार्थ्यांने आपल्या स्वत:च्या तासाखेरीज अन्यवर्गाच्या अथवा अन्यविषयाच्या तासांना संबंधीत प्राध्यपकांच्या परवानगीशिवाय बसु नये.

९ वर्ग चालू असतांना विद्यार्थ्यास कोणीही भेटण्याचा प्रयत्न करु नये भेटण्यासंबंधीची माहिती प्रथम कार्यालयात द्यावी.

१० इतर तासीका चालू असतांना आपल्या वागण्याने कुठलाही त्रास त्यांना होणार नाही यांची प्रत्येक विद्यार्थ्यांने काळजी घ्यावी.

११ महाविद्यालयात व महाविद्यालया बाहेर कोठे ही विद्यार्थ्याचे वर्तन सभ्यतेचे असावे महाविद्यालयाचे नांव बदनाम होईल अशा प्रकारचे वर्तन करु नये.

१२ विद्यार्थी, विद्यार्थीनीस महाविद्यालयात कोणी त्रास देत असल्यास त्या संबंधीची माहिती प्राचार्य /उपप्राचार्य यांच्याकडे द्यावी.

१३ रॅगिंग करणे /घेणे हा दखलपात्र गुन्हा आहे त्यासाठी विद्यार्थ्याने रॅगिंग करण्याचा घेण्याचा प्रयत्न करु नये.

१४ एखाद्या विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या शिस्त पालनाचे नियम मोडल्यास त्या संदर्भात शिस्त पालन समिती व प्राचार्य योग्य तो निर्णय घेतील तो अंतिम निर्णय असून तो त्या विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

## महाविद्यालय सोडल्याचा दाखला (T.C.) संबंधी नियम

विद्यार्थ्याने महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण झाल्यास अथवा सोडल्यास त्याने केलेल्या मागणी नुसार महाविद्यालय सोडल्याचा दाखला दिला जातो. त्यासाठी त्यास,

१. टि.सी.काढण्यासंबंधी महाविद्यालयात छापील अर्ज मिळेल तो त्याने पूर्ण अचुक भरुन कार्यालयात द्यावा.

२. निर्धारीत शुल्क भरुन सदरील पावती अर्जासोबत जोडावी.

३. अर्ज केल्यापासून साधारणपणे पाच दिवसात टि.सी.मिळेल.

४. मूळ टि.सी. हरवला असल्यास डुप्लीकेट टि.सी.मिळेल पण मा.तहसिलदार यांचे प्रतिज्ञापत्र संबंधीत व पोलीस स्टेशन यांना दिलेला T.C. हरविण्याचा अर्जाची प्रत अर्जासोबत जोडावी.

५. टि.सी.अर्जासोबत मागील परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची सत्यप्रत जोडावी.

६. टि.सी.अर्जासोबत आधारकार्ड ची झेरॉक्स जोडावी.

७. विद्यार्थ्यांनी स्वत: टि.सी.घेण्यासाठी यावे दुसऱ्यास टि.सी.दिली जाणार नाही.

## भारत सरकारच्या आर्थिक सवलती व शिष्यवृत्ती

१. निर्वाह शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी)
२. राष्ट्रीय शिष्यवृत्ती
३. राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती
४. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना अगर मुलींना मिळणारी भारत सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती
५. अ.हिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती
६. अपंग मुलांसाठी केंद्रसरकाराची शिष्यवृत्ती
७. मागासवर्गीय अनुसूचित जाती, जमाती, नवबौध्द व इतरमागासवर्गीय (एस.सी.,एस.टी., एन.टी.,व्हि.जे.एन.टी., ओ.बी.सी.,एस.बी.सी.) विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती व फी माफी.
८. अल्पसंख्याकांच्या पाल्यांना मिळणारी शिष्यवृत्ती
९. आम आदमी विमा योजना (कनिष्ठ महाविद्यालयासाठी)

**वरील सर्व शिष्यवृत्त्या व फी सवलती पात्र विद्यार्थ्यांना संबंधित, खात्याकडून मंजुरी मिळाल्यावर महाविद्यालयामार्फत मिळतील.**

भारत सरकार शिष्यवृत्तीचा फॉर्म या कार्यालयात दाखल करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी खालील बाबींची पूर्तता करावी. शिष्यवृत्ती / फी सवलत फॉर्म प्रवेश झाल्यानंतर त्याच दिवशी किंवा नंतर दोन तीन दिवसांच्या आत घेऊन जाऊन आधार कार्ड सत्यप्रत जोडावी.

१. सदरील फी सवलती साठी/स्कॉलरशीपसाठी त्या त्या योजनेखाली विद्यार्थ्याने स्वतंत्र फॉर्म भरणे आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीचे कोरे आवेदनपत्र महाविद्यालयातून विनामूल्य मिळतील. भरलेले व आवश्यक कागदपत्र जोडलेले आवेदनपत्र स्विकारले जातील.

३. कोरे आवेदनपत्र घेण्यासाठी व भरलेले आवेदनपत्र दाखल करण्यासाठी विद्यार्थी स्वत:हजर असणे आवश्यक आहे. कोरे आवेदनपत्र एकदाच मिळेल व त्यासाठी ओळखपत्र किंवा प्रवेश पावती दाखवावी लागेल.

४. आवेदन पत्र महाविद्यालयात दाखल करण्याची शेवटची तारीख १५ ऑगस्ट आहे. मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.

५. विवाहित महिलांनी पालक म्हणून पतीस दाखवावे व पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा. वडीलांच्या /आईच्या उत्पन्नाचा दाखला जोडू नये.

६. खाजगी /सरकारी निमसरकारी इ.नोकरी करणाऱ्या पालकांनी तसेच पेन्शन घेणाऱ्या पालकांनी उत्पन्नाचा दाखला त्याच्या तालुक्याच्या तहसिलदाराचा जोडावा.

७. पालक म्हणून वडील/आई असतील व ते हयात नसल्यास त्यांच्या मृत्युचा दाखला जोडावा व जे पालक दाखवाल त्याच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा.

८. शिष्यवृत्ती घेण्यासाठी खंड झाल्यास संबंधित तहसिलदार यांचे मूळ शिक्षणात खंड पाडल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

९. उत्पन्नाचा दाखला, प्रमाणपत्र मूळ रहिवाशी असलेल्या तालुक्याच्या तहसिलदाराचे जोडावे.

१०.जिल्हा बदल झालेला असल्यास पुर्वीच्या जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याचे जिल्हा बदल प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व महाविद्यालय बदल झाल्यास परवानगी देण्याबाबतचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, यांचे पत्र फॉर्म सोबत जोडावे.

११. शिष्यवृत्ती अर्जाधील प्रत्येक रकाना भरलेला असावा काही माहिती आवश्यक नसल्यास निरंक लिहावे.

१२.शाळेच्या टि.सी.वरील जातीच्या यादीतील व जातीच्या प्रमाणपत्रातील जात सारखी पाहिजे तरच शिष्यवृत्ती अर्ज स्विकारला जाईल.